महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी ब्रम्हपुरी यांचे कार्यालय

ईमेल:-sdo.bramhpuri@gmail.com दुरध्वनी क्रमांक:-07177-272028

क्र.कावि/संकिर्ण/कोव्हिड-19/2020/*258* दिनांक:- 18 ऑगस्ट,2020

संदर्भ :- 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियिम 2005, कलम 34 (C) 34 (M)
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897,
3. मा.जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/600दि.17 जून,2020
4. या कार्यालयाचे आदेश क्र.कावि/संकिर्ण/कोव्हिड-19/2020/249, दिनांक 06 ऑगस्ट,2020
5. मुख्याधिकारी नगर परिषद ब्रम्हपुरी यांचे पत्र क्रमांक कावि/नपब्र/साप्रवि/2020/872 दिनांक 14.08.2020

**-: आदेश :-**

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक 13 मार्च, 2020 च्या अधिसुचनेन्वये राज्यात कोरोना विषाणुमुळे (COVID-19) उदभवणाऱ्या संसर्गजन्य आजारामुळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. व या विषाणूमूळे उदभवलेल्या संसर्ग रोगाच्या नियंत्रणास्तव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामुळे राज्यात साथरोग अधिनियम, 1897 मधील खंड 2, 3, व 4, ची अंमलबजावणी अधिसुचनेच्या दिनांकापासुन लागु करण्या आलेली आहे.

ज्याअर्थी केंद्र शासन व राज्य शासनाने मार्गदर्शक सुचना निर्गमित करुन दिनांक 31 ऑगस्ट,2020 पावेतो संपुर्ण महाराष्ट्रात लॉकडाऊन लागु राहील असा आदेश करण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी **नगर परिषद ब्रम्हपुरी हद्दीतील (देलनवाडी वार्ड प्रभाग क्रमांक 08) ता. ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर** या भागात कोरोना बाधीत रुग्ण आढळुन आल्याने व त्यांचा प्रादुर्भाव इतर भागात पसरु नये याकरीता सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच प्रभागातील नागरीकांचे हित व सुरक्षेस्तव अधिकची उपाय योजना तातडीने करणे आवश्यक होते.

आणि ज्याअर्थी भारत सरकार आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय दिल्ली यांनी Novel Coronavirus Disease 2019 (COVID-19) बाबत Containment Plan निर्धारित केला असुन त्यानुसार कोरोना विषाणुव्दारे बाधीत व्यक्ती/ समुदायाच्या केंद्रबिंदु परिसरा पर्यंत नागरीकांची हालचाल/फिरणे/संपर्क यावर निर्बंध घालुन मज्जाव करणेबाबत निर्देशीत केले होते.

त्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 च्या कलम 34 (C) व 34 (M) आणि फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144(1)व 144 (3)अंतर्गत **नगर परिषद ब्रम्हपुरी हद्दीतील (देलनवाडी वार्ड प्रभाग क्रमांक 08) ता. ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर** येथील व इतर भागात कोरोना विषाणुचा संसर्ग इतर नागरीकांना होऊ नये या दृष्टीने सदर भागाच्या सिमा बंद करण्याबाबत **संदर्भिय क्रमांक** 04 अन्वये आदेश दिलेले होते.

आणि ज्याअर्थी मा.जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2020/ 600 दि.17 जून,2020 आदेशान्वये चंद्रपूर जिल्हयात कोरोना विषाणुचे संसर्ग झालेला रूग्ण क्षेत्रात आढळून आल्यास त्या क्षेत्रातील संबधित उपविभागीय अधिकारी तथा Sub divisional Incident Commander यांना

Scanned with CamScanner

सदर क्षेत्र प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) निश्चित करून त्या क्षेत्राच्या सीमा तात्काळ प्रभावाने बंद करणे व प्रतिबंधीत क्षेत्रासंबधीत इतर कार्यवाही करण्याकरीता प्राधिकृत केलेले आहे.

ज्याअर्थी **मुख्याधिकारी नगर परिषद, ब्रम्हपुरी** यांनी **संदर्भिय क्रमांक** 05 नुसार **नगर परिषद ब्रम्हपुरी हद्दीतील (देलनवाडी वार्ड प्रभाग क्रमांक 08) ता. ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर** या भागातील तपासणी अंती कोरोना नकारात्मक आढळून आल्याचे सादर केलेल्या अहवालानुसार **संदर्भिय क्रमांक** 04 वरील आदेशान्वये **नगर परिषद ब्रम्हपुरी हद्दीतील (देलनवाडी वार्ड प्रभाग क्रमांक 08) ता. ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर** या भागातील प्रतिबंधित केलेल्या क्षेत्राच्या सिमा याद्वारे पुर्ववत सुरू करण्यास काहीही हरकत नाही अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी **नगर परिषद ब्रम्हपुरी हद्दीतील (देलनवाडी वार्ड प्रभाग क्रमांक 08 हनुमान मंदिर जवळ) ता. ब्रम्हपुरी जि.चंद्रपूर** या भागातील प्रतिबंधीत केलेल्या क्षेत्राच्या सीमा या आदेशान्वये पुर्ववत सूरू करण्यात येत आहे.

(क्रांती डोंबे)
**उपविभागीय दंडाधिकारी**
**ब्रम्हपुरी**

**प्रतिलीपी :- माहितीस्तव सविनय सादर,**

1. मा.जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.
2. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपुर यांना माहितीस सविनय सादर.
3. मा. पोलीस अधिक्षक, चंद्रपुर चंद्रपुर यांना माहितीस सविनय सादर.
4. मा.जिल्हा आरोग्य अधिकारी , जि.प. चंद्रपुर यांना माहितीस सविनय सादर.
5. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपुर माहितीस सादर.
6. उपविभागीय पोलीस अधिकारी, ब्रम्हपुरी यांना माहितीस सादर.

**प्रतिलिपी :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस.**

1. तहसिलदार, ब्रम्हपुरी/नागभिड यांना माहिती तथा कार्यवाहीस अग्रेषित.
2. पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी/नागभिड यांना माहिती तथा कार्यवाहीस अग्रेषित.
3. गट विकास अधिकारी ब्रम्हपुरी / नागभिड यांना माहिती तथा कार्यवाहीस अग्रेषित.
4. मुख्याधिकारी,नगर परिषद ब्रम्हपुरी/नागभिड यांना माहिती तथा कार्यवाहीस अग्रेषित.
5. वैद्यकिय अधिक्षक ग्रामीण रूग्णालय,ब्रम्हपुरी/नागभिड यांना माहिती तथा कार्यवाहीस अग्रेषित.
6. तालुका आरोग्य् अधिकारी ब्रम्हपुरी/नागभिड यांना माहिती तथा कार्यवाहीस अग्रेषित.

**उपविभागीय दंडाधिकारी**
**ब्रम्हपुरी**

Scanned with CamScanner